

# सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची ।

सुखकर्ता दु :खहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।। ध।।
सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची ।।
कंठी झळके माळ मुक्ताफळांची ।।जय ।। १।।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती।
दर्शनमात्रें मन:कामना पुरती ।
रत्नखचित फरा तुज गौरीकुंमरा ।।
चंदनाची उटी कुंकमकेशरा ।।
हिरेजडित मुकुट शोभतो बरा ।
रूणझुणती नूपुरें चरणीं घागरिया ।। जय।।२।।
लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।।
दास रामाचा वाट पाहे सदना ।।
संकटी पावावे, निर्वाणी रक्षावे, सुरवर वंदना ।।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती।
दर्शनमात्रें मनकामना पुरती ।। जय ।। ३।।



# श्री शंकराची आरती

लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा ॥
विषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा ॥
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा ॥
तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां
जय देव जय देव श्रीशंकरा ॥
आरती ओवाळूं तुज कर्पूरगौरा ॥१ ॥
कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा ॥
अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा ॥
विभुतीचें उधळण शितिकंठ नीळा ॥
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ।जय ॥ २॥
देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केलें ॥
त्यामाजीं अवचित हलाहल उठिलें ।
तें त्वां असुरपणें प्राशन केलें ॥
नीलकंठ नाम प्रसिध्द झालें ॥ जय॥ ३॥
व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ॥
पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ॥
शतकोटींचें बीज वाचे उच्चारी ॥
रघुकुळटिळक रामदासा अंतरीं ॥ जय ॥ ४॥



# दुर्गादेवीची आरती

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं ॥
अनाथनाथें अंबे करूणा विस्तारीं ॥
वारीं वारीं जन्ममरणातें वारीं ॥
हारीं पडलों आता संकट निवारीं ॥
जय देवी जय देवी महिषासुरमथिनी ॥
सुरवरईश्वरवरदे तारक संजिवनी ॥ जय... ॥ ध्रु ॥
त्रिभुवनभुवनीं पहातां तुज ऐसी नाहीं ॥
चारी श्रमले परंतु न बोलवे कांही ॥
साही विवाद करितां पडले प्रवाहीं ॥
ते तूं भक्तांलागी पावसि लवलाही ॥ जय... ॥ २ ॥
प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासा ॥
क्लेशापासुनि सोडीं तोडीं भवपाशा ॥
अबें तुजवाचून कोण पुरविल आशा ॥
नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा ॥ जय... ॥ ३ ॥



# विठोबाची आरती

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा।
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा।
पुंडलिकाचे भेटी परब्रम्ह आले गा।
चरणी वाहे भीमा उध्दरी जगा।
जय देव जय देव जय पांडुरंगा।
रखुमाईवल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा॥ १॥
तुळसीमाळा गळां कर ठेवुनि कटीं।
कांसे पीतांबर कस्तुरी लल्लाटीं।
देव सुरवर नित्य येती भेटी।
गरूड हनुमंत पुढें उभे राहती॥ २॥
धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा।
सुवर्णाची कमळें वनमाळा गळा।
राई रखुमाबाई राणीया सकळा।
ओवाळीती राजा विठोबा सावळा॥ ३॥
ओवाळू आरत्या कुरवंडया येती।
चंद्रभागेमाजी सोडूनिया देती।
दिंडया पताका वैष्णव नाचती।
पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ ४॥
आषाढी कार्तिकी भक्तजन येती ।
चंद्रभागेमाजी स्नानें जे करिती।
दर्शनहेळामात्रे तयां होय मुक्ती
केशवासी नामदेव भावें ओवाळीती ॥ ५॥



# आरती दत्ताची

त्रिगुणात्मक त्रैमुर्ती दत्त हा जाणा।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा।
नेति नेति शब्द नये अनुमाना।
सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना।
जय देव जय देव जय श्रीगुरूदत्ता।
आरती ओवाळितां हरली भवचिंता ॥ धृ ॥

सबाह्य अभ्यंतरी तूं एक दत्त।
अभाग्यासी कैंची कळेल ही मात।
पराही परतली तेथे कैंचा हा हेत।
जन्ममरणाचा पुरलासे अंत ॥ जय ॥ १॥

दत्त येऊनियां उभा ठाकला।
सद्भावे साष्टांगेसीं प्रणिपात केला।
प्रसन्न होऊनी आशीर्वाद दिधला
जन्ममरणाचा फेरा चुकविला ॥ जय ॥ २॥

दत्त दत्त ऐंसे लागले ध्यान।
हारपलें मन झालें उन्मन।
मी तूं पणाची झाली बोळवण।
एका जर्नादनी श्रीदत्त जाण ॥ जय ॥ ३ ॥



# विठ्ठलाची आरती

येई हो विठ्ठलें माझे माउली ये ॥
निढळावरी कर ठेवुनि वाट मी पाहे ॥ ध्रु॥

आलिया गेलिया हातीं धाडीं निरोप ॥
पंढरपुरी आहे माझा मायबाप॥ येई ॥ १॥

पिवळा पीतांबर कैसा गगनीं झळकला ।
गरूडावरी बैसोनि माझा कैवारी आला ॥ येई ॥ २॥

विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिपवाळी ॥
विष्णुदास नामा जीवेंभावें ओवाळी ॥ येई ॥ ३॥

असो नसो भाव आम्हां तुझीया ठायां ।
कृपा दृष्टी पाहे माझ्या पंढरीराया ॥ येई ॥ ४॥



# आरती ज्ञानराजाची

आरती ज्ञानराजा, आरती ज्ञानराजा।
महाकैवल्य तेजा कैवल्य तेजा।
सेवती साधुसंत मन वेधला माझा,
वेधला माझा आरती ज्ञानराजा॥ १ ॥

लोपले ज्ञान जगी, लोपले ज्ञान जगी।
हित नेणती कोणी, नेणती कोणी।
अवतार पांडूरंग,नाम ठेविले ज्ञानी,
ठेविले ज्ञानी आरती ज्ञानराजा॥ २ ॥

कनकाचे ताट करी,कनकाचे ताट करी।
उभ्या गोपिका नारी,गोपिका नारी।
नारद तुंबरो हो। साम गायन करी, गायन करी।
आरती ज्ञानराजा॥ ३ ॥

प्रकट गुह्य बोले, प्रगट गुह्य बोले।
विश्व ब्रम्हाची केले, ब्रम्हाची केले।
राम जनार्दनी, पायी मस्तक ठेविले,
मस्तक ठेविले। आरती. . . ॥ ३ ॥





# साईबाबाची आरती

आरती साईबाबा। सौख्य दातार जीवा।
चरण रजतळी द्यावा दासा विसावा भक्ता विसावा आरती ॥

जाळुनिया अनंग सस्वरूपी राहे दंग।
मुमुक्षजना दावी निज डोळा श्रीरंग॥ आरती साईबाबा ॥

जयामनी जैसा भाव, तया तैसा अनुभव।
दावीसी दयाधना ऐसा तुझा यो भाव ॥ आरती साईबाबा॥

तुमचे नाम घेता, हरे संस्कृती व्यथा।
अगाध तव करणी, मार्ग दावीसी अनाथा ॥ आरती साईबाबा॥

कलियुगी अवतार, सगुणब्रम्ह साचार।
अवतीर्ण झालासी, स्वामी दत्त दिगंबर॥ आरती साईबाबा॥

आठादिवसा गुरूवारी, भक्त करीती वारी।
प्रभूपद पहावया, भवभरा निवारी ॥ आरती साईबाबा॥

माझनीजद्रव्य ठेवा, तव चरणरज सेवा।
मागणे हेची आता, तुम्हा देवाधी देवा ॥ आरती साईबाबा ॥

इच्छित दिन चातक, निर्मळ तोय निज सुख।
पाजावे माधवा या सांभाळ आपुली भाक॥ आरती साईबाबा॥

# आरती दशाअवताराची



आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रम्ह ।
भक्त संकटी नाना स्वरूपी स्थापिसी स्वधर्म ॥ १॥

अंनत्रऋषिकारणे गर्भवास सोशीसी ।
वेद नेले चोरूनि ब्रम्हा आणुनिया देसी ।
मत्सरूपी नारायण सप्तही सागर धुंडीसी ।
हस्त लागता तुझा शंखासुरा वर देसी आरती ॥ २॥

रसातळासी जाता पृथ्वी पाठीवर घेसी ।
परोपकारासाठी देवा कासव झालासी ।
दाढे धरूनी पृथ्वी नेता वराहरूप होसी ।
प्रल्हादा कारणे नरहरि स्तंभी गुरगुरसी आरती ॥ ३॥

पाचवे अवतार बळीच्या व्दाराला जासी ।
भिक्षे स्थळ मागुनी बळीला पाताळा नेसी ।
सर्व समर्पण केले म्हणुनी प्रसन्न त्या होसी ।
वामनरूप धरूनी बळीच्या व्दारी तिष्ठसी ॥ ४॥

सहस्त्रार्जुन मातला जमदग्नीचा वध केला ।
कष्टी ते रेणूका म्हणुनी सहस्त्रार्जुन वधीला ।
नि:क्षत्री पृथ्वी दान दिधली विप्राला ।
सहावा अवतार परशुराम प्रगटला ॥ ५॥

मातला रावण सर्वा उपद्रव केला।
तेहतीस कोटी देव बंदी हरले सीतेला।
पितृवचनासाठी रामे वनवास केला।
मिळोनी वानरसेना राजाराज प्रगटला आरती ॥ ६॥

देवकी वसुदेव बंदी मोचन त्वा केले।
नंदाघरी जावूनी निजसुख गोकुळा दिधळे।
गोरस चोरी करता नवलक्ष गोपाळ मिळविळे।
गोपिकांचे प्रेम देखुनी श्रीकृष्ण भुलले ॥ ७ ॥

बौदध कलंकी कलयुगीं झाला अधर्म हा अवघा।
सोडून दिधळा धर्म म्हणुनी न दिरासी देवा।
म्लेंच्छमर्दन करीसी म्हणुनी कलंकी केशवा।
बहिरवी जान्हवी निज सुखनंदाची सेवा आरती ॥ ८॥

ओवाळू आरती मदनगोपाळा । श्यामसुंदरा गळा वैजयंतीमाळा ।।धृ।।

चरणकमल ज्याचे ति सुकुमार । ध्वजवज्राकुश ब्रीदाचे तोडर ।।

ओवाळू आरती मदनगोपाळा । श्यामसुंदरा गळा वैजयंतीमाळा ।।1।।

नाभिकमल ज्याचे ब्रह्मचर्याचे स्थान । हृदयी पदक शोभे श्रीवत्सल छान ।।

ओवाळू आरती मदनगोपाळा । श्यामसुंदरा गळा वैजयंतीमाळा ।।2।।

मुखकमल पाहता सुखिचिया कोटी । वेधले मानस हारपली दृष्टी ।।

ओवाळू आरती मदनगोपाळा । श्यामसुंदरा गळा वैजयंतीमाळा ।।3।।

जडित मुगट ज्याचा देदीप्यमान । तेणे कोंदले अवघे त्रिभुवन ।।

ओवाळू आरती मदनगोपाळा । श्यामसुंदरा गळा वैजयंतीमाळा ।।4।।

एका जनार्दनी देखियले रूप । पाहता जाहले अवघे तद्रूप ।

ओवाळू आरती मदनगोपाळा । श्यामसुंदरा गळा वैजयंतीमाळा ।।5।।

# आरती भजन

घालीन लोटांगण वंदीन चरण। डोळयांनि पाहिन रुप तुझे ।।
प्रेमें आलिंगन आनंदें पूजिन । भावें ओंवाळिन म्हणे नामा ।।१।।

त्वमेव माता च पिता त्वमेव, बंधुश्व सखा त्वमेव।।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव, त्वमेव सर्व मम देव देव ।।२।।

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा,
बुध्दयात्मना वा प्रकृतिस्वाभावात् करोमि यद्यत् सकलं परस्मै,
नाराणायेति समर्पयामि।।३।।

अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम्।।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकीनायकं रामचंद्र भजे ।।४।।

हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।५।।

# मंत्रपुष्पांजली

ओम यज्ञेन यज्ञमयजं तदेवास्तानि धर्मणि प्रथमान्यासन् ।
ते हं नाकं महिमान सचंत यत्र पूर्वे साध्या: संतिदेवा: । ओम्
राजाधिराजाय प्रसह्य साहिने मो वयं वैश्रवणायं कुर्महे ।
स मे कामान कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रमणो ददातु ।।
कुबेराय वैश्रवणाय महारजाय नम: । ओम् स्वस्ति
साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठयं राज्यंह
महाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्या ईस्यात सार्वभौम:ई
सर्वायुष आंतादापरार्धात् । पृथिव्यै समुद्रपर्यंताया
एकराळिति ।। तदप्येषश्लोकोभिगीतो मरूत: परिवेष्टारो
मरूत्तस्यावसन् गृहे ।। आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवा:
सभासद इति ।।

एकदंताय विद्महे । वक्रतुंडाय धिमहि ।।
तन्नो दंती प्रचोदयात् ।।

गणपती बाप्पा मोरया । पुढच्या वर्षी लवकर या ।।